ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# सेंद्रिय शेती – काळाची गरज

**प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे ( उपप्राचार्य)**
अर्थशास्त्र विभाग
शरदचंद्र कला वाणिज्य महाविद्यालय, बुटीबोरी, नागपूर

★★★

**प्रस्तावना** – भारतीय समाज जीवन बघताना निरोगी व स्वस्थ जीवन जगणे सध्याच्या परिस्थितीत महत्वाचे झाले आहे आपल्या सवयी व आवडी निवडी वर आपले आरोग्य अवलंबून असते मग आपण घेतो तो प्राण वायू असो अथवा आपण खात असलेले अन्नपदार्थ त्यातील प्रदुषण म्हणजे रासायनिक प्रक्रिया कशी झाली ते कसे निर्मीत करण्यात आले कोणत्या द्रव्याचा त्यावर वापर करण्यात आला हे महत्त्वाचे त्यात धान्य पिकवीताना वापरण्यात येणारी रसायने असो अथवा कारखान्यात होणारे प्रक्रियाकरन सर्व आरोग्यासाठी घातक असल्याचे दिसून येते यात सर्वप्रथम आपण ज्या जमिनीत पीक घेतो तेथूनच विचार करने गरजेचे आहे.

भारतात पुर्वी पारंपरिक पद्धतीने शेती केली जात होती म्हणजे सेंद्रिय खतांचा भूमीत व सेंद्रिय औषधे पीकांवर फवारणी करून पीक उत्पादन घेतले जात पण जास्त नफा कमविण्यासाठी आधुनिकीकरणाचा विचार करून भूमी व पिकांवर रासायनीक खते व किटकनाशकाचा वापर करण्यात येऊ लागला. रासायनीक खते व रासायनीक किटकनाशके याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याने भूमीचा कस कमी झाला भूमी तू उत्पादीत अन्नधान्य यावर देखील परिणाम झालेला दिसतो. रासायनीक खता मुळे कस कसा कमी होतो? म्हणजे आधी ज्या एकरी शेतीतून शेतकरीऱ्याला ४ क्विंटल पीक प्राप्त होत असे आता १ क्विंटल पीक प्राप्त होते त्यातून त्या भूमीचा कस कमी झाला हे सिध्द होते. भूमीचा कस वाढविणे व भूमी नापीक होवू नये या साठी प्रयत्न करणे आवष्यक आहे तेथे रासायनीक खता ऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करून पीक उत्पादन घेतले जाणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा व आरोग्यदायी लाभाचा विचार करून भारतातील काही राज्यांनी आपल्या क्षेत्रात सेंद्रिय शेतीला महत्त्व दिले आहे ज्यात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्येप्रदेश, गुजरात, तमिलनाडू, केरळ, राजस्थान, नागालैंड, मिझोराम व सिक्कीम या राज्यांनी प्रमुखतेने विचार केला त्यात त्यांनी प्रमाणके व प्रमाणीकरण या संकल्पनेचा वापर करून पीक उत्पादन तंत्रे विकसित केले व शासकीय स्तरावरून सेंद्रिय शेती संबंधात राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी केल्याचेही दिसून येते.?

### सेंद्रिय शेतीचे उद्देश

१.) सेंद्रिय खतांचा व सेंद्रिय किटकनाशके उपयोग करून शेतीतील भूमीचा कस कमी होण्यास आळा घातला येतो व रासायनीक खते व किटकनाशके या पासून भूमीचे रक्षण केले जाते

२.) सेंद्रिय खतांचा व द्रव्याचा उपयोग पिकांसाठी करावा. त्यामुळे भूमी व पीकांचेव सुक्ष्म जीवाणूंचे रक्षण होईल.

३.) सेंद्रिय स्वरूपातील नायट्रोजनचा उपयोग करावा आणि कार्बनीक द्रव्यांची फवारणी करावी.

४.) पीकांचे रोगांपासून संरक्षण करण्यासाठी रासायनीक द्रव्यांची फवारणी केल्याने आरोग्यावर दुष्परिणाम होतात म्हणून पीकावर रासायनीक द्रव्याचा उपयोग टाळावा.

५.) सेंद्रिय खते प्राण्यांपासून प्राप्त होते म्हणून जनावरांनची काळजी घ्यावी ज्यात त्यांचे राहण्याचे ठिकाण व चारा याचे विषेश लक्ष द्यावे.

६.) महत्वाचे म्हणजे पर्यावरणावर पडणारा प्रभाव जंगल आणि त्यात असणारे प्राणी व प्रकृतीक जीव यांचे संरक्षण करावे.

### काळाची गरज लक्षात घेऊन सेंद्रिय शेती अवलंब केल्यास उपयोग–

१.) सेंद्रिय षेती द्वारे भूमीची उत्पादन क्षमता स्थिर ठेवणे शक्य होते.

२.) सेंद्रिय शेतीतून भूमी व पर्यावरण संतुलित राखण्यास मदत होते.

३.) सेंद्रिय शेती ने कृषी मित्र आणि उपयोगी कृमी व किटकांच्या संरक्षण होईल.

४.) सेंद्रिय खते व द्रव्यासाठी लागणारा खर्च कमी करण्यास मदत होते

५.) सेंद्रिय खतांचा व द्रव्याचा उपयोग कमी खर्चात अधिक उत्पादन व लाभ प्राप्त करून देतो.

६.) सेंद्रिय शेती पासून प्राप्त अन्य धान्य, फळे आणि भाजीपाला यांचे मुल्य पोष्टीकता रासायणीक पध्दतीच्या तुलनेत जास्त असते.

सेंद्रिय शेती करताना शेतकऱ्यांनी शेती पिकविण्यासाठी योग्य प्रकारे जमीनीची मशागत करून दर्जेदार बी–बीयाणे निवडावी त्यामुळे भरघोस पीक प्राप्त होते व पीके ही आलटून पालटून घ्यावी जमीनीची

कस वाढविण्यासाठी शेणखत, वाळलेल्या तनाचे खत , शेळ्या, मेंढ्या,डुकर., कोंबडी , गांडूळ, कासव , या सारख्या प्राण्यांच्या विष्ठेतून प्राप्त खत तसेच हाडाचा चुरा या सारख्या प्राणीजन्य सेंद्रिय खताचा उपयोग करावा.

**सेंद्रीय शेती करणे आवश्यक –**

1. मातीचे संवर्धन झाले पाहिजे.
२. तापमानात होणा–या बदलानुसार उत्पादन घेणे.
३. पावसाचे पाणी अडवा झाडे जगवा यासाठी नियोजित संवर्धन.
४. पाण्यासाठी सौर उर्जाचा,सौर नलिकांचा उपयोग.
५. शेतीसाठी उपयोगी गरजांचे नियोजन.
६. नैसर्गिक कालचक्रांचा विचार आणि त्याचे पालन.
७. जनावरांची काळजी.
८. नविनिकरणीय संसाधनाचा उपयोग.

**सेंद्रीय शेतीचे मुख्य वैशिष्टे**

१. **मातीची सुपीकता कायम टिकवून ठेवता येते** सेंद्रीय शेती हि एक स्थायी आणि पर्यावरणास अनुकूल असी उत्पादन प्रक्रिया आहे की ज्यामुळे लहान शेतक–यासाठी फायद्याचे असते. शेतीची योग्य पध्दतीने मशागत करून कमी खर्चात जास्त व दर्जेदार उत्पादन घेता येते.

२. आर्थिक उत्पादनात वाढ सेंद्रीय शेती पध्दती पीकांची लागवड केल्यास शेतक–यांना करावा लागणारा खर्च कमी येतो व आर्थिक फायदे होते. सद्या भारतात रासायनिक खते व किटकनाशक फवारनी यावर प्रचंड खर्च करावा लागतो. परंतु उत्पन्नात व उत्पादनात वाढ होत नाही. शेतक–यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर वाढला की आत्महत्याचे प्रमान वाढते.

३. अन्न सुरक्षिततेची खात्री व जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल भारतात हरितक्रांती जेव्हा घडून आली तेव्हापासून रासायनिक खतांचा वापर जमीनीत मोठ्या प्रमाणात होऊ लागला, वारंवार एकच एक पीक त्या जमीनीतून घेत आहेत त्यामुळे शेतातील उत्पादन घटत आहे. तसेच अन्नघान्य व इतर पीकात पौष्टिकतेचे प्रमान कमी होऊन आरोग्यास हानीकारक होते.परंतु सेंद्रीय शेतीतील अन्नधान्य व उत्पादन विशमुक्त होऊन आरोग्य, जीवनमान उंचावण्यासाठी मदत होते.

**सेंद्रिय शेती मुळे फायदे**

१. नत्र पुरवठा जमीनीत सेंद्रिय खते टाकल्यास झाडाची झपाट्याने वाढत होते फळे व फुले अधीक येतात.

२. जमीनीच्या ओलावा क्षमतेत वाढरू जर शेतीत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास जमीनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते व जमीनीची धूप थांबते.

३. कार्बनीक पुरवठा जमीनीची असंख्य जीवानूच्या वाढीसाठी कार्बनीक सेंद्रिय खतांचा उपयोग होतो हे जीवाणू झाडांना जमिनीतून अन्नद्रव्य उपलब्ध करून देण्यास व पीकांची वाढ होऊन उच्च प्रतीच्या आरोग्यास पोषक असणारे उत्पादनाची निर्मिती होते. भूमी संरक्षण व सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी पुन्हा एकदा सेंद्रिय षेती कडे वळणे गरजेचे असल्याचे दिसून येते काळाची पावले ओळखून काही ठिकाणी सेंद्रिय शेती ची वाट धरत असल्याचे दिसते ज्यातून आरोग्य, पर्यावरणाचे संवर्धन करणे शक्य होते.

***संदर्भ***

*1. 'बोहरा, मनात. " जैवीक खेती समय की मांग" कृषी सेवा पत्रिका, घक्टोबर ३०,२०१७, http://www-krishisewa-com] acces फेबृवारी २८,२०१८.*

*2. धुबे, नागेश शेंद्रिय खतांचे प्रकार." कृषकिंग, नोव्हेंबर ३,२०१७, ttp://www-krishiking- com] acces-मार्च,२,२०१८*

*3. मधसुदन, गजेंद्र सिंह."जमाना जैवीक खेळती का." कुरुक्षेत्र६०, अंक०५(२०१६)रू२४–३०.*

*'4. पटवर्धन, जगदीश."सेंद्रिय षेती आणि फायदे." फेबृवारी,१०,२०१४, http://www-maathisrushti\com]acces- मार्च,६,२०१८.*